# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली, दिनांक ०९/१२/२०१७

## *महिला पायलट 'मयुरी देशमुख' यांची नक्षलग्रस्त गडचिरोलीत गगनभरारी*

- *एटापल्ली येथे मयुरी देशमुख यांनी मुलींना केले मोलाचे मार्गदर्शन*

गडचिरोली जिल्हयात माओवादयांनी घोषीत केलेल्या पी.जी.एल. सप्ताहाला प्रत्युत्तर म्हणून गडचिरोली पोलीस नेहमीच नाविन्यपुर्ण उपक्रम राबवित आहे. त्याचाच एक भाग म्हणून पोस्टे एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय, एटापल्ली येथे मयुरी देशमुख यांचे मुलींना 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अनुषंगाने मार्गदर्शन आयोजीत करण्यात आले होते. मयुरी देशमुख या दि. ०३ डिसेंबर पासून गडचिरोली येथे पवनहंस या सरकारी हेलीकॉप्टर सेवेच्या माध्यमातून नव्याने 'पायलट' या पदावर रूजु झाल्या असून सध्या पोलीसांकडून राबविल्या जाणाऱ्या नक्षलविरोधी ऑपरेशनमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. विशेष म्हणजे निवृत्त आयपीएस पोलीस अधिकारी 'शिवाजीराव बारवकर' यांच्या त्या नात असून पोलीस दलाचा वारसा असल्याने एक वेगळया प्रकारची जिद्द व उत्साह त्यांच्यात नेहमीच दिसून येतो. सन-२००८ मध्ये अमेरिकेत ट्रेनिंग पुर्ण केल्यानंतर त्यांनी २००९ सालापासुन 'पायलट' या पदावर नियुक्ती झाली आहे. तेव्हापासून त्या आपली सेवा अविरतपणे बजावत आहेत. विशेष म्हणजे त्यांचे वडील विश्वासराव देशमुख हे देखील Indian Air Force मध्ये Group Captain पदी कार्यरत होते. सध्या ते रिटायर झाले आहेत. त्यांची लहान बहीण राधिका ही देखील खाजगी विमानकंपनीत 'पायलट' चे काम करत असून या 'पायलट कुटुंबातील' मुलींचा आदर्श इतरांसमोर मांडून आदिवासी मुलींना त्यातुन प्रेरणा मिळावी या हेतुने हया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात मुलींशी संवाद साधताना मयुरी देशमुख यांनी सांगितले की, ''तुम्हाला यशस्वी होण्यसाठी आत्मविश्वास व आपल्या ध्येयासाठी घ्यावे लागणारे कष्ट करण्याची तयारी व चिकाटी आवश्यक आहे. सध्या गडचिरोलीसारख्या ग्रामीण भागातील मुलींनी घराबाहेर पडून पुरुषांचा खांदयाला खांदा लावून काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले''.

यावेळी उपस्थित मुलींपैकी एका १० वीच्या वर्गातील विद्यार्थीनींने त्यांना 'मलाही तुमच्यासारखी आकाशात उंच भरारी घ्यायच आहे त्यायाठी काय करावे लागेल?' असे

विचारल्यावर मयुरी देशमुख यांनी या प्रश्नासाठी तिच कौतुक करून स्वप्नांतुनच उद्याच भविष्य ठरत असत यशस्वी होण्यासाठी सार्वात अगोदर स्वप्न पाहण्याची आवश्यकता असते तु नक्कीच तुझे स्वप्न पुर्ण करशील व याकामी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

याप्रसंगी एटापल्ली उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. किरणकुमार सुर्यवंशी, एटापल्लीचे पोस्टेचे पालीस निरीक्षक श्री. विठ्ठल पी. आचेवार, भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय, एटापल्लीचे प्राचार्य डॉ. एस.एन. बुटे सर, भगवंतराव माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, एटापल्लीचे श्री. एस.एन. पठाण सर उपस्थित होते. सदर कार्यक्रमात तब्बत २०० विद्यार्थीनींनी सहभाग नोंदिविला होता. कार्यक्रमाचे प्रा. श्री. किशोर बुरबुरे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन प्रा. घोंगडे सर यांनी केले.



